कामगार उप आयुक्त, गट-अ (एस-२३: रु.६७७००-२०८७००) या पदावर तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन आदेश क्रमांक:-पदोन्न-०६२४/प्र.क्र.१२१/कामगार-८**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २५ सप्टेंबर, २०२४

**वाचा :**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या-१२, दि.०१.०८.२०१९.

२) सामान्य प्रशासन विभाग/ का-१२ (सेवा-३) टिप्पणी दि.१३.०८.२०२४.

**शासन आदेश:**

कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ (एस-१८: रु.४९१००-१५५८००) या संवर्गातून कामगार उप आयुक्त, गट-अ (एस-२३: रु.६७७००-२०८७००) या संवर्गात ०३ अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत सन २०२३-२४ च्या निवडसूचीस सामान्य प्रशासन विभागाने दि.१३.०८.२०२४ च्या टिप्पणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन खालील अधिकाऱ्यांना सहायक कामगार आयुक्त, गट-अ संवर्गातून कामगार उप आयुक्त, गट-अ या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | प्रवर्ग | पदोन्नतीनंतरची पदस्थापना कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री. वि. निं. चौधरी,<br>सहाय्यक कामगार आयुक्त | इ.मा.व | कामगार उप आयुक्त, पालघर |
| २. | श्री. ल. य. भुजबळ,<br>सहाय्यक कामगार आयुक्त | इ.मा.व. | कामगार उप आयुक्त (औद्योगिक संबंध), कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई. |
| ३. | श्रीम. शर्वरी पोटे,<br>सहाय्यक कामगार आयुक्त | अ.जा. | कामगार उप आयुक्त (प्रशासन), कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई. |

२. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे. तसेच, दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णय प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून, त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

३. उपरोक्त तक्त्यात नमूद पदोन्नत अधिकाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी याद्वारे तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत असून, त्यांनी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. याबाबतचा रुजू अहवाल संबंधित पदोन्नत अधिकाऱ्यांनी कामगार आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करावा. सदर अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार संबंधितावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जाऊ नये. तसेच, पदस्थापना रद्द अथवा त्यात बदल करणेसाठी कोणत्याही स्वरुपाचे आवेदन सादर करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील २ (ड) मधील तरतुदीनुसार पदोन्नतीने नियुक्ती होणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदर आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या विहित मुदतीमध्ये रुजू होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रुजू न झाल्यास संबंधित अधिकाऱ्याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन (dias non) म्हणून गणला जाईल, याची देखील संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०९२५१६२५४६३११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c963876 4849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC 41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2024.09.25 16:27:24 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४. अपर कामगार आयुक्त, कोकण.
५. कामगार उप आयुक्त (प्रशासन), कामगार आयुक्त कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
६. महालेखापाल कार्यालय (ले. व अ.)/(ले.प.), महाराष्ट्र, मुंबई-१
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर.
९. संबंधित पदोन्नत अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
१०. निवडनस्ती (कामगार-८)